।। श्री स्वामी समर्थ ।।

# अथ श्री स्वामी समर्थस्य आदिमाया शक्ति रूप स्तोत्रम्



**श्री गणेशाय नमः**

**श्री स्वामी समर्थाय नमः**

**।। अथ गणेश स्तवन ।।**

नमो विघ्नहर्ता महापापहर देव ।
आद्यकर्ताच सर्व वेदानां शुभ कर्ताच सर्व कार्येषु ।।

गजानन महापातक नाशक सदा सर्व भक्तानां संतुष्ट कारक ।
मम कर्दमरूपी मनसि सौंदर्यरूपी कमलं उमलायति ।।

तद् ज्ञानरूपी कमल स्तोत्रं मम आशिर्वाद दायकम् ।
समर्थस्य सद्गुरू रूपेण जीवन तेजोकरं कर्मण: ।।

सहाय्य कराय आनंद दायकायच सुरेश्वराय नमो नमस्ते ।
सकल जड विश्वाचा एकच निर्गुण आधार ।।

त्रिगुणात्मक सर्वाधी साक्षिभूत तो दत्तावतार ।
नाव तयाचे स्वामी समर्थ असुनी ते दिगंबर ।।

किती वर्णु त्यांनी केलेल्या ज्ञानदर्शक लिला अपार ।
म्हणुनी अक्कलकोटीचे स्वामी समर्थांस येतो शरण ।।

तुम्हीच उजळवावे मायाजाळात अडकलेले या पामराचे जीवन ।
दाखवावी स्वच्छ वाट या पामरी जीवनास ।।

पुर्णविराम द्यावा येथील सुख दु:खाच्या मायेस ।।धृ।।

समर्थांनी दाखविले दर्शविले रूप या माया शक्तिचे ।।
आदी कारण या नाटकी सृष्टीच्या उत्पत्तीचे ।।

आहेत तीस दशभुजा कराया धावन ।
वंदन करूया तीस नतमस्तक होऊन ।।१।।

वरील हस्तांमध्ये पाशांकुश आणि कुऱ्हाड ।
त्यानंतरच्या हस्तांत खड्ग व ढाल ।।

तृतीय मधील हस्तामद्धे त्रिशुल व भाला सुरेख ।
चतुर्थ करात शंख व धनुर्बाण भावक ।।२।।

पंचम कर असे ते भक्ता पुण्यदायी ।
वामकरात शोभते कमल सहस्त्रारी ।।

सह्रद दक्षिण कराने ती आशिर्वाद देई ।
तारावे दुःख सागरातून बनुनी मायेची आई ।।३।।

शोभती देहावरी साडी लाल ती मखमली ।
ज्यावरी मौल्यवान रत्ने सांगू किती जडली ।।

कमालीची सुवर्णतार तीजवरी मोहक रितीने विणलेली ।
सौभाग्याचे लेणे ते कुंकू शोभते तिच्या भाली ।।४।।

प्रकाश ज्ञानमय पाझरती स्वनेत्रांतून ।
जो सोडवी या जीवास मायाजाळातून ।।

कर्णी कुंडले असे ती तीन कमळाकृतींची ।
झळकती घुंघरे तीस नऊ रौप्य हिऱ्यांची ।।५।।

नाकामध्ये असे नथनी सुंदर ती हेमाची ।
चकचकीत पीत मोती वाढवी शोभा तयेची ।।

युगुल ओष्टे लाल ती कोमल व नाजुक ।
मंदस्मिताने वास करीती भक्तांच्या ऋणमंदिरात ।।६।।

डोईवरी शोभतो मुकुट हिरे-पाचु-माणिक्याचा ।
मधोमध असलेला नीलमणी वाढवी साज तयाचा ।।

असे उभी ही आई शुभ्रकमळात सहस्त्रारी ।
शोभा वाढवित ती बाजुची राजहंसे तयेची भारी ।।७।।

असे साजेसे रुप त्या आदिमायेचे ।
वंदन करूया मस्तक ठेवूनी चरणावरी तियेचे ।।

माता जननी आई आहे ती या मायाविश्वाची ।
असे काळजी तीस इथे गुंतलेल्या या बालकाची ।।८।।

धरिले घट्ट आता मी आईच्या पदाला ।
आशिर्वाद दे आता या बापुड्या शरणागताला ।।

सुटकां कर माझी या सुख-दुःखाच्या भोवऱ्यातून ।
तारून नेई या बालकास मुक्तिच्या सागरातून ।।९।।

हे जग जणु कोष्ट्याचे असे जाल ।
चौकट असे ती एकाहुन एक जहाल ।।

जशी माशी अडकते स्व:करून या जालात ।
सोडवा मला तदृत गुंतलेल्या येथील मिथ्या भावात ।।१०।।

येथे सुख-दु:खाचे जणु भले मोठाले डोंगर ।
एक सुख करी चार-पाच दु:खाचे प्रहार ।।

सुख जणु मोहक पुष्पवाटीका रंगीबेरंगी फुलांची ।
कुठे दिसती नंतरची गटारे दुर्गंधीयुक्त गलिच्छ दु:खाची ।।११।।

येथेच चाले सावळा खेळ भूतप्रेतादिकांचा ।
सोडव मला येथुन घेऊन अवतार कालिका मातेचा ।।

दु:खाची डबकी आहेत येथे एकाहुन एक घाण वासाची ।
घेऊनी अवतार संतोषी मातेचा मुक्तता दे कमालीची ।।१२।।

काळा निर्जन जणु पहाड दारिद्रय व ऋणाचा ।
समाधान आनंद दे घेऊनी अवतार लक्ष्मीमातेचा ।।

रोग अपमृत्युचा चाले खेळ अक्राळ विक्राळ
घेऊनी दुर्गा सोडव माझ्या मागील हे लचाळ ।।१३।।

दयेची कृपेचीच ती करूणावतारी शुध्द मुर्ती ।
ऐकली आहे नगण्य मी अगम्य तुझीच किर्ती ।।

म्हणुनी करितो याचना बापुडां मी तुझ्यापाशी ।
आतातरी दाखव वाट मुक्तिची घेऊनी मला कुशी ।।१४।।

संसार आहे हा दु:खमयी विषाचा सागर ।
तो तारूनि दाखव मजला मुक्तीचा क्षीरसागर ।।

असा आहे जो कल्पान्ती न नासेल ।
आत्मा जन्ममृत्युच्या फेऱ्यात न गुंतता स्वस्थ बसेल ।।१५।।

तुझे बाळ पाही तुझीच वाट देवी ।
नको वेळ लावू शिरी वरदहस्त ठेवी ।।

तारी मला संसाराच्या काटेरी झुडूपातून ।
पोचवी परब्रह्माच्या प्रकाशात हे मायाजाल सारून ।।१६।।

शुभं भवतु ।  शुभं भवतु ।।  शुभं भवतु ।।।

मंगळवारी व शुक्रवारी देवी समोर बसून ११ वेळा स्तोत्र वाचणे व देवी समोर एक नारळ ठेवून घराच्या सुखसमृध्दीचे व समाधानाचे गाऱ्हाणे घालणे असे केल्याने लक्ष्मीचा वास अखंड घरात राहून आरोग्य लाभते.
३ वेळा आजारी व्यक्तीने पठण करुन कपभर पाण्यात थोडे गुलाबजल मिसळावे. व ते प्यावे रोगाचा नाश होतो.
४१ दिवस कर्जबाजारी व्यक्तीने उत्तरेकडे तोंड करुन पठण करावे व पठण झाल्यावर १ रुपयाचे नाणे एका डब्यात ठेवावे. असे ४१ दिवस दररोज करावे. ४१ व्या दिवशी जमा झालेल्या पैशातून शेंगदाणे किंवा हरभरे विकत घेऊन पक्षांना खाऊ घालणे. असे केल्याने कर्जमुक्ती होते.
१०१ दिवस चांदीच्या ३ दुर्वा समोर ठेवून दररोज एकदा पठण केल्याने व १०१ व्या दिवशी श्री महादेव, श्री गौरी व श्री गणेशाचा अभिषेक केल्याने स्वघराच्या इच्छेची पूर्ती होते. स्वतःचे घर झाल्यावर त्या ३ दूर्वा तिजोरीत ठेवणे. संकटसमयी पठण केल्याने संकटाचा नाश होतो.